राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता--

रजेच्या कालावधीत आहरित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन परिपत्रक, क्रमांक: घभाभ-१०९९/प्र.क्र.९३/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई:- ३२, दिनांक:-४ सप्टेंबर, २०००.

पहा:- १) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक: घभाभ-१०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा-५, दिनांक: ११ डिसेंबर, १९९८.
२) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक : घभाभ-१०९९ /प्र.क्र.८१/९९/सेवा-५, दिनांक: ७ सप्टेंबर, १९९९.

**शासन परिपत्रक**

पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या शहर पूरक भत्ता व घरभाडेभत्त्याच्या दरांमध्ये सुधारणा केल्यावर, राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना लागू असलेल्या स्थानिक पुरक भत्ता व घरभाडेभत्त्याच्या दरांमध्ये वर १ व २ येथे नमूद केलेल्या आदेशान्वये दि.१/८/१९९७ पासून सुधारणा केली आहे. त्यातील तरतुदीनुसार सध्या कर्मचा-यांना त्यांनी दरमहा आहरीत केलेल्या मूळ वेतनाच्या टक्केवारीनुसार घरभाडेभत्त्याचे प्रदान केले जाते.

२. यासंदर्भात कर्मचा-याने उपभोगलेल्या असाधारण रजा, अर्धवेतनी रजांच्या कालावधीतील घरभाडेभत्त्याची परिगणना करतांना ती कशी करावी याबाबत विचारणा होत होती.

३. शासन याबाबत आता असा खुलासा करीत आहे की ,मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ३४४ खालील तरतुदीनुसार (सदर तरतूदी नियमातील इतर आनुषंगिक तरतुदींसह सुलभ संदर्भासाठी सोबत जोडल्या आहेत.) सेवानिवृत्तीपूर्व रजा, नाकारलेली रजा व अंतिम रजा ह्या रजांव्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या रजांच्या कालावधीत घरभाडेभत्ता अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. सदर नियमांतील तरतूदी अद्यापही लागू आहेत. त्यामुळे कर्मचा-याने उपभोगलेल्या असाधारण रजा, अर्धवेतनी रजांच्या परीणामी त्या महीन्याचे कमी करण्यात आलेले मूळ वेतन लक्षात न घेता, त्याने त्या रजा उपभोगल्या नसत्या तर त्यास जे मूळ वेतन देय ठरले असते, तेच मूळ वेतन घरभाडेभत्त्याची परिगणना करतांना लक्षात घेण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Scanned by CamScanner